**पाहिजेत**
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटर वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ३२ वा | मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# 'बीओटी'च्या नावाखाली महापालिकेच्या मोक्याच्या जागांवर डल्ला?

## विरोधकांचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीचे नऊ आरक्षित भूखंड 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर विकसित करण्याच्या प्रस्तावावरून सत्ताधारी भाजप आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय संघर्ष पेटला आहे.

या भूखंडांची मालकी पालिकेकडेच कायम राहणार असून मूळ आरक्षण अबाधित ठेवूनच शासकीय नियमांनुसार विकास केला जात असल्याचा निवाळा महापौर विनायक कोंड्याल यांनी दिला आहे. तर, दुसरीकडे, पालिकेच्या महत्वाच्या जागा खासगी विकासकांच्या घशात घालण्याचा हा डाव असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीने महापालिका मुख्यालयात तीव्र निदर्शने केली.

महानगरपालिकेच्या मंगळवारी (दि. १८) होणाऱ्या सर्वसाधारण सभेत प्रशासनाकडून ७ आणि महापौरांनी सुचवलेल्या २ अशा एकूण ९ जागांचा बीओटी प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. याविरोधात काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), माकप, आप आणि मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (दि.१७) दुपारी महापालिका मुख्यालयात घोषणाबाजी करत ठिय्या आंदोलन केले. पाणीपुरवठा योजनेतील सुमारे १५० कोटी रुपयांची तूट भरून काढण्यासाठी शाळा व उद्यानांच्या जागांचे खासगीकरण करणे चुकीचे असल्याचा आक्षेप आघाडीने घेतला. सत्ताधारी विकासनिधी आणण्यात अपयशी ठरल्यानेच हे भूखंड बिल्डरांच्या हवाली केले जात असल्याचा घणाघात काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी केला. हा प्रस्ताव मागे न घेतल्यास सर्वसाधारण सभा बंद पाडण्याचा, मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात आंदोलन करण्याचा आणि थेट न्यायालयात जाण्याचा इशारा विरोधकांनी दिला आहे.



भाजपची पश्चिम विभागीय बैठक गुरुवारी (२० ऑगस्ट) सोलापुरात होत असून, त्यानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह वरिष्ठ नेते सोलापुरात येणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी रान उठवले आहे. महापालिकेत संख्याबळ नगण्य असतानाही विरोधी पक्षांनी एकत्र येत भाजपला जेरीस आणले असून, सत्ताधारी पक्षांतर्गत गटबाजीत गुरफटल्याची चर्चा आहे.

### पहिल्या टप्प्यात दोनच जागा; ७० कोटींचे उत्पन्न : महापौर

शासनाच्या जुलै २०२६ च्या आदेशानुसारच बीओटीचा निर्णय घेण्यात आला असून, पालिकेचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी सायंकाळी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. पहिल्या टप्प्यात सातरस्ता येथील बस डेपो आणि गोल्डफिंच पेठेतील जुना बैल गोठा या दोनच जागा विकसित केल्या जातील; ज्यातून सुमारे ७० कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे. विरोधकांनी सत्तेत असताना अनेक जागा बीओटीवर दिल्या आहेत. काही मोकळ्या जागा लाटल्या; अशा मोक्याच्या जागांची यादी प्रशासनामार्फत तयार करून सोलापूरकरांसमोर आणली जाईल, असे सांगत विरोधकांचे लक्ष विकासापेक्षा स्टंटबाजीवरच अधिक असल्याचा टोला महापौरांनी लगावला.

# सोलापूर शहराबाहेरून तिसरी-चौथी रेल्वेलाईन

## ५३० एकर भूसंपादनाची प्रक्रिया सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे-सोलापूर-वाडी दरम्यानच्या ३९४.११ किलोमीटर रेल्वेमार्गावरील वाढता वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सोलापूर शहराबाहेरून सोरेगावमार्गे तिसरी आणि चौथी रेल्वेलाईन उभारण्यास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे.



या नव्या रेल्वेमार्गासाठी सहा तालुक्यांतील जवळपास ५३० एकर जमिनीचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

सध्या सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागातून दोन रेल्वेमार्ग जातात. या मार्गावर प्रवासी गाड्यांसोबत मोठ्या प्रमाणात मालगाड्यांचीही वाहतूक होते. त्यातच प्रवासी गाड्यांची संख्या वाढल्याने रेल्वे वाहतुकीवर ताण निर्माण झाला आहे.

अनेकदा प्रवासी गाड्यांना सिग्नलवर थांबावे लागत असल्याने त्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होत होता. ही बाब लक्षात घेऊन रेल्वे मंत्रालयाने शहराबाहेरून स्वतंत्र तिसरी आणि चौथी रेल्वेलाईन उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

सोरेगावमार्गे प्रस्तावित बाह्य रेल्वेमार्गामुळे मालगाड्यांची वाहतूक शहराच्या मध्यवर्ती भागातून वळविता येणार आहे. मालगाड्यांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध झाल्याने सध्याच्या दोन रेल्वेमार्गावरील प्रवासी वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रवासी गाड्या अधिक सुरळीतपणे आणि वेळेत धावण्याची शक्यता असून, रेल्वे वाहतुकीची कार्यक्षमता वाढणार आहे.

प्रस्तावित तिसरी आणि चौथी रेल्वेलाईन पुणे-दौंड-कुर्डुवाडी-सोलापूर पुढे कलबुर्गी-वाडी या रेल्वेमार्गाशी जोडली जाणार आहे. त्यामुळे सोलापूरच्या रेल्वे नेटवर्कची क्षमता वाढण्यासोबतच भविष्यातील वाढत्या प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे.

शहराच्या बाह्य भागातून प्रस्तावित करण्यात आलेला हा रेल्वेमार्ग कवठे, डोणगाव, भाटेवाडी, नंदूर, सोरेगाव आणि कुमठे या परिसरांतून जाणार आहे. नव्या मार्गासाठी संबंधित भागातील जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या बाह्य रेल्वेमार्गाचा थेट फायदा सोलापूर शहरातील रेल्वे वाहतूक व्यवस्थेला होणार असून, बाळे आणि टिकेकरवाडी स्थानकांवरील प्रवासी वाहतूकही अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा आहे.

नव्या तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वेलाईनमुळे सोलापूरच्या रेल्वे नेटवर्कची क्षमता वाढणार असून, भविष्यातील वाढती प्रवासी आणि मालवाहतूक हाताळण्यासाठी रेल्वेला अतिरिक्त पर्याय उपलब्ध होणार आहे.

# पापय्या तालीम संघात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुनी मील कंपाऊंड येथील ऐतिहासिक पापय्या तालीम प्रांगणात पापय्या तालीम संघाच्यावतीने १५ ऑगस्ट रोजी ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. देशभक्तीपर वातावरणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे माजी उपप्राचार्य तथा संस्थेचे उपाध्यक्ष प्रदीप शिर्के यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भारती विद्यापीठाचे माजी उपप्राचार्य नामदेव पवार, जुनी मिल पोलीस लाईन सहकारी गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन अनिकेत व्यवहारे, संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ व्यवहारे, सेक्रेटरी शिवाजी चटके, सहसेक्रेटरी विजय पाटील, खजिनदार पै. प्रकाश सुरवसे, सदस्य पै. अजीत शिंदे, वस्ताद वसंत कुलकर्णी, पै. राकेश मेट्रे, जयंत मोरे, किरण बायस, लक्ष्मण भगत, बंडू कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पापय्या तालीम संघाच्या माध्यमातून व्यायाम, कुस्ती व क्रीडा क्षेत्राला सातत्याने प्रोत्साहन दिले जात असून, या ऐतिहासिक तालमीच्या प्रांगणात स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडल्याने परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी अजय शिंदे, कृष्णा जोशी, अतुल कोथिंबीरे, अमोल जाधव, ओम पवार, अमोल कोळी, प्रकाश जाधव, महेश पवार, रणजीत खताळ, संभाजी मळगे, बबन लाभद झिंगाडे, श्रीनिवास कोटा, विकास घाडगे, प्रभाकर व्यवहारे यांच्यासह तालीम संघाचे सभासद, व्यायाम व क्रीडाप्रेमी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते लहान मुलांना मिठाईचे वाटप करण्यात आले. यामुळे मुलांमध्येही स्वातंत्र्य दिनाचा उत्साह पाहायला मिळाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन वस्ताद गणेश कुलकर्णी यांनी केले, तर जयंत मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. तालीम संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# सोलापूरमध्ये १.११ लाख रेशनकार्डधारक अपात्र

## लाभ कायमचा बंद होणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारकडून अंत्योदय योजनेमधील लाभार्थींना दरमहा (प्रतिकार्ड ३५ किलो, २२ किलो गहू, १३ किलो तांदूळ) व प्राधान्यक्रमातील कुटुंबांना (प्रतिव्यक्ती तीन किलो गहू व दोन किलो तांदूळ) मोफत धान्य दिले जाते.

मात्र, आता निकषांत न बसणाऱ्या सोलापूर शहरातील ३९ हजार १२२ आणि ग्रामीणमधील ७२ हजार ४८ रेशन कार्डधारकांचे धान्य कायमचे बंद होणार आहे.

सोलापूर शहरात अंत्योदय व प्राधान्यक्रमातील पाच लाख १९ हजार लाभार्थी आहेत. तर ग्रामीणमध्ये सव्वाचार लाखांहून अधिक लाभार्थी प्राधान्यक्रम व अंत्योदय योजनेमधील आहेत. या लाभार्थींना दरमहा सरकारकडून मोफत धान्य मिळते. मात्र, यातील अनेक लाभार्थी निकषांनुसार अपात्र आहेत. त्यानुसार केंद्र सरकारने जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांना १० ऑगस्ट रोजी अपात्र लाभार्थींच्या




याद्या पाठविल्या आहेत.

यात काही लाभार्थींचे वय १०० वर्षे पूर्ण झाले, तरीदेखील ते धान्य उचलतात. काही लाभार्थींचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्याचेही आढळले आहे. या लाभार्थींबद्दल शंका आहे. काही लाभार्थी सहा ते दहा महिने झाले, रेशन दुकानातून धान्यच घेत नाहीत. धान्य न उचलणारे, वय कमी-अधिक असलेल्या लाभार्थींची तालुकास्तरावर, शहरातील नगरांमध्ये जाऊन पडताळणी केली जात आहे.

परंतु, चारचाकी वाहन असलेले, वार्षिक उत्पन्न सहा लाखांपेक्षा जास्त असलेल्यांचे धान्य बंद केले जाणार आहे. आता सर्व लाभार्थींची ई-केवायसी केली जाणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील लाभार्थींची स्थिती**

- शहरातील लाभार्थी - ५,१९,४६३
- अपात्र ठरणारे लाभार्थी - ३९,१२२
- ग्रामीणमधील लाभार्थी - ४,२५,०९२
- अपात्र ठरणारे लाभार्थी - ७२,०४

# भोंदू मनोहर भोसले प्रकरणात दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिवा माया झोळ यांना पोलिस कोठडी

## एसआयटीच्या तपासाला वेग

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** मनोहर भोसले प्रकरणातील तपासाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून, या प्रकरणात आता पुणे जिल्ह्यातील एका शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात आली आहे. दत्तकला इन्स्टिट्यूट (शिक्षण संस्था), स्वामी चिंचोली (ता. दौंड, जि. पुणे) येथील संस्थेशी संबंधित तिघांना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांना २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

कुडुर्वाडी पोलिस ठाण्यात मनोहर भोसले प्रकरणी गुन्हा क्रमांक १९२/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३१८(२), ३१८(४), ३(५) तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यातील विविध कलमांनुसार २३ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणातील मुख्य आरोपी मनोहर चंद्रकांत भोसले आणि त्याच्या इतर साथीदारांविरुद्ध सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात आतापर्यंत एकूण सहा गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सोलापूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी या गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केली आहे. या पथकाने आतापर्यंत या प्रकरणाशी संबंधित २४ आरोपींची नावे निष्पन्न केली आहेत.

तपासादरम्यान दत्तकला इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष रामदास झोळ यांचा मनोहर भोसले याला मिळालेल्या कथित अवैध पैशांची विल्हेवाट लावण्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणी संस्थेशी संबंधित राजेंद्र गोकुळ हुंबे यांना ११ ऑगस्ट २०२६ रोजी, तर लक्ष्मीकांत मनमथ लिगाडे यांना १३ ऑगस्ट २०२६ रोजी अटक करण्यात आली होती.

यानंतर तपासात रामदास झोळ यांच्या पत्नी माया झोळ यांचाही या प्रकरणात सहभाग असल्याचे समोर आल्यानंतर १६ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांना अटक करण्यात आली. यापूर्वी अटक करण्यात आलेल्या आरोपींना १७ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली होती.

दरम्यान, तिन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आल्यानंतर पोलिसांनी पुढील तपासासाठी कोठडीची मागणी केली. न्यायालयाने ती मान्य करत आरोपींना २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकामार्फत सुरू असून, पुढील तपासात आणखी माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# राज्यात १ हजार ४४० डॉक्टरांची लवकरच नियुक्ती

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी उपलब्ध झालेल्या एक हजार ४४० डॉक्टरांची येत्या काही दिवसांत नियुक्ती करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आणखी ६०० डॉक्टरांच्या भरतीसाठी जाहिरात काढण्यात येत असून सुमारे २५०



दंतचिकित्सकही लवकरच आरोग्य सेवेत दाखल होतील, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महिला आरोग्य समिती, जन आरोग्य समिती आणि रुग्णकल्याण समितीच्या सदस्यांशी आरोग्यमंत्र्यांनी ऑनलाइन 'जन आरोग्य संवाद' साधला. या माध्यमातून आतापर्यंत सहा लाखांहून अधिक नागरिकांशी संवाद साधण्यात आला आहे. आगामी काळात आणखी चार लाख नागरिकांशी संवाद साधण्यात येणार असून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याचा (पान 2 वर..)

# सोलापूरमध्ये 21 ऑगस्टला 'महावॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर', रिल्स स्पर्धेसाठी 50 हजारांची बक्षिसे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** माती वाचवा, पाणी जपा.. सुरक्षित भविष्य घडवा! जलसंधारणाच्या जनजागृतीसाठी सोलापूर जिल्ह्यात 15 ते 21 ऑगस्ट दरम्यान जलसंधारण सप्ताह उत्साहात साजरा करण्यात येत आहे. जलसंधारण दिनानिमित्त सोलापूर येथे 21 ऑगस्टला 'महावॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर', स्पर्धेत ही जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

**21 ऑगस्टला महावॉकेथॉन**

जलसंधारण सप्ताहाचा समारोप म्हणून 21 ऑगस्ट रोजी सकाळी 7 वाजता 'महावॉकेथॉन - वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात आली आहे.

ही वॉकेथॉन होम मैदान येथून सुरू होऊन डफरीन चौक, सेंट जोसेफ विद्यालय, महात्मा गांधी पुतळा, भैय्या चौक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक, सिद्धेश्वर प्रशाला, जिल्हा परिषद पूनम गेट, रंग भवन मार्गे पुन्हा होम मैदान येथे समाप्त होणार आहे.

नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन पाणी आणि माती संवर्धनाचा संदेश द्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. सहभागासाठी https://register.mahaevent.co.in/#/register या लिंकवर किंवा खाली दिलेल्या QR कोडद्वारे नोंदणी करता येईल.

**नोंदणीसाठी QR कोड स्कॅन करा:**

!attachment://wa_image_2820579065778486623

चला, सोलापूर!

आजची एक छोटी बचत उद्याचे सुरक्षित भविष्य घडवू शकते. त्यामुळे माती आणि पाण्याच्या संवर्धनासाठी आपण सर्वांनी एक पाऊल पुढे टाकूया. #SaveSoilSaveWater #WalkForWater #Mahawalkathon #WaterConservation #Solapur

**रिल्स स्पर्धेत आकर्षक बक्षिसे**

सप्ताहाअंतर्गत युवकांसाठी 'मृद व जलसंवर्धन रिल्स स्पर्धा' देखील घेण्यात येत आहे. पाणी आणि माती संवर्धनावर आधारित सर्जनशील रिल्स बनवून युवकांनी सहभाग घ्यावा. स्पर्धेतील विजेत्यांसाठी प्रथम ₹25,000, द्वितीय ₹15,000 आणि तृतीय ₹10,000 अशी एकूण ₹50,000 रुपयांची आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

या अभियानाचा शुभारंभ 15 ऑगस्ट रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. याच कार्यक्रमात युवकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'मृद व जलसंवर्धन रिल्स स्पर्धे'च्या लोगोचेही अनावरण पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले.

**पाहिजेत**

वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव व अनोखी योजणा राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| २) | सह/उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ३) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ४) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ५) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छुक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरून, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ५० वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करू शकतो. ३) सर्व अधिकार सदर संस्थेकडे राखीव राहतील व ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. सदर संस्थेचा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

संपर्क :- वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, महिंद्रा शोरुमसमोर, होटगी रोड, सोलापूर-१४३००३.

मो.९६५७०६९०६९, ९४०३४६३०७९

## संपादकीय

# औद्योगिकीकरणाला ब्रेक

महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये तब्बल 36 हजारांपेक्षा जास्त उद्योगधंदे बंद झाल्याची माहिती लोकसभेच्या सभागृहातच संबंधित मंत्र्याने दिली आहे.

एकीकडे देशात महाराष्ट्र सर्वात जास्त औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य आहे आणि गुंतवणूक करण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य असलेले राज्य असल्याचा दावा करण्यात येत असतानाच, केंद्र सरकारने अधिकृतपणे दिलेल्या या माहितीमुळे औद्योगिकीकरणाला केवळ ब्रेक मिळाला आहे, असेच लक्षात येत नाही तर औद्योगिकीकरणाच्या तथाकथित दाव्यांचा फुगाही फुटला आहे.

हा विषय राज्यातील विरोधी पक्ष जेव्हा स्वतःच्या अजेंड्याड्यावर घेतील आणि राज्य सरकारला जाब विचारतील तेव्हा अर्थात नेहमीप्रमाणे सरकारकडे काहीतरी उत्तर तयार असेलच. पण पाच वर्षांच्या कालावधीमध्ये 36 हजार उद्योगधंदे बंद झाले आहेत, हे वास्तव मात्र नाकारता येणार नाही. ही आकडेवारी पाच वर्षांपासूनची आहे. म्हणजेच ज्यावेळी कोविड महामारीतून सर्व अर्थव्यवस्था बाहेर येत होती, त्याचा तत्कालीक फटका अनेक उद्योगांना बसला होता. तसाच या उद्योगांना बसल्यामुळेच त्यांना आपला व्यवसाय बंद करावा लागला असे पण एक कारण देण्यात येत आहे. कोविड महामारीच्या कालावधीमध्ये संपूर्ण अर्थव्यवस्थेलाच मंदी आली होती आणि अनेक अनेक उद्योगांची परिस्थिती बिकट झाली होती. पण त्याचा तत्कालीन परिणाम म्हणून एवढे उद्योग निश्चितच बंद पडले नसतील.

या व्यतिरिक्त कामगारांच्या समस्या असोत किंवा अर्थव्यवस्थेला आलेली मरगळ असो किंवा मागणीचा अभाव असो या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणूनसुद्धा अनेक उद्योग बंद पडल्याची माहिती लोकसभेतच देण्यात आली आहे. केंद्रातील मोदी सरकारने सत्तेवर आल्यापासून छोट्या व मध्यम उद्योगांसाठी ज्या विविध योजना समोर आणल्या होत्या त्याचा लाभ उद्योजक घेत आहेत की नाहीत हेसुद्धा या निमित्ताने समोर आले आहे.

कारण बंद पडलेल्या 36 हजार उद्योगांमध्ये 14 हजार पेक्षा जास्त एमएसएमई म्हणजेच सूक्ष्म, मध्यम आणि लघु उद्योगांचा समावेश आहे. सरकारची स्टार्ट अप इंडिया योजना असो किंवा स्किल इंडिया योजना असो, या सर्व योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण केल्यास दावा जरी केला जात असला तरी जेव्हा लघु आणि मध्यम उद्योग एवढा मोठ्या प्रमाणात बंद पडतात तेव्हा धोरण पातळीवर काहीतरी चुकत आहे हे मान्य करावेच लागते. एवढे उद्योग बंद पडले हे निश्चित गंभीर आहेच; पण हे उद्योग बंद पडल्यामुळे किती लोकांवर बेरोजगाराची कुर्हाड कोसळली याची अधिकृत आकडेवारी मात्र सरकारकडे उपलब्ध नाही, हे विचित्र आहे. ढोबळमानाने अंदाज जरी करायचा झाला आणि प्रत्येक उद्योगात सरासरी किमान 10 कर्मचारी कामाला होते, असे जरी म्हणले तरी सुमारे चार लाख जणांचा रोजगार गेला असा निष्कर्ष सहज काढता येतो.

या विषयातील एक अत्यंत गंभीर गोष्ट ही आहे की महाराष्ट्रातील औद्योगिकदृष्ट्या प्रगत आणि गुंतवणूक करण्यासाठी योग्य जे जिल्हे मानले जातात, त्याच जिल्ह्यातील उद्योग सर्वाधिक बंद पडले आहेत. उदाहरणार्थ मुंबईतील 12000 उद्योग, पुण्यातील 6000 उद्योग, ठाण्यातील 4000 उद्योग बंद पडले आहेत. पुणे जिल्ह्यातील चाकण एमआयडीसीतील अनेक उद्योजकांनी आपले स्थलांतर सातारा जिल्ह्यातील खंडाळा एमआयडीसीमध्ये करण्याचा निर्णय घेतल्याची बातमी ताजी आहे, तो संदर्भसुद्धा या ठिकाणी महत्त्वाचा आहे.

औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्ह्यामध्ये अशाप्रकारे उद्योग बंद होण्याचे किंवा स्थानांतरित होण्याचे प्रमाण का वाढत चालले आहे याचा शोध सरकारला घ्यावाच लागेल. देशातील सर्वात प्रगत राज्य मानलेल्या महाराष्ट्रामध्ये आणि महाराष्ट्रातील सर्वात प्रगत जिल्हे असलेल्या मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक जिल्ह्यांमध्येच जर अशा प्रकारे उद्योगांची टाळेबंदी होत असेल, तर एकूण औद्योगिकीकरणाचे चित्र विदारक आहे हे मान्यच करावे लागेल. येत्या कालावधीमध्ये सरकार या विषयाचे निश्चितच स्पष्टीकरण देईल. काही वेळा अतिशय वेगळ्या कारणांमुळेसुद्धा उद्योगधंदे बंद होतात. पण ते प्रमाण खूपच कमी असते. जेव्हा मालाला उठाव नाही, योग्य प्रकारे सुविधा उपलब्ध होत नाहीत व उद्योगधंद्याची परिस्थिती दिवाळखोरीपर्यंत येऊन पोहोचली आहे अशा कोणत्याही कारणाने जरी उद्योगधंदा बंद पडला असेल तर या कारणाच्या मुळापर्यंत जाऊन अशी परिस्थिती पुन्हा उद्भवणार नाही हे पाहण्याचे काम सरकारला करावेच लागेल.

दरवर्षी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये फिरून लाखो, कोटी रुपयांचे करार करून महाराष्ट्रात उद्योग आणल्याचे दावे करत असतात. या परदेश दौऱ्यांमध्ये जे विविध करार केले जातात, त्यांचा सध्याचा स्टेटस काय आहे हेसुद्धा या निमित्ताने सरकारने जाहीर करायला हरकत नाही.

एखादा नवा उद्योग जेव्हा उभा राहत आहे, असे सरकार अभिमानाने सांगते, त्याच वेळी या उद्योगाच्या निमित्ताने किती रोजगार निर्मिती होणार आहे याचीसुद्धा माहिती दिली जाते. पण एखादा उद्योग बंद होतो तेव्हा किती जणांचा रोजगार जाणार आहे याबाबत सरकार काहीच खुलासा करत नाही हा विरोधाभाससुद्धा लक्षात घेण्यासारखा आहे. महाराष्ट्रातील औद्योगिकीकरणाला ब्रेक मिळण्याचे जे संकेत आता मिळू लागले आहेत, त्याची दखल सरकारने गांभीर्याने घेऊन योग्य उपाययोजना करण्याची वेळ आली आहे.

पान १ वरून

## राज्यात १ हजार ४४० डॉक्टरांची...

प्रयत्न केला जाणार आहे. या संवादादरम्यान रुग्णालयांमध्ये डॉक्टर वेळेवर उपस्थित राहतात का, रुग्णांशी त्यांचा योग्य संवाद होतो का, आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत का, तसेच आरोग्य समित्यांच्या बैठका नियमित होतात का, याची थेट माहिती घेण्यात आली. कागदावरील आकडेवारीपेक्षा प्रत्यक्ष रुग्णालयातील सेवा आणि नागरिकांचा अनुभव महत्त्वाचा असल्याचे आबिटकर यांनी सांगितले.

आरोग्य सेवांबाबतच्या तक्रारी नागरिकांना थेट प्रशासनापर्यंत पोहोचविता याव्यात, यासाठी लवकरच स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात येणार आहे. तक्रारींचे प्रभावीपणे निराकरण करण्यासाठी यंत्रणा उभारण्यात येणार आहे. स्थानिक बचत गटांच्या माध्यमातून रुग्णांना सकस व पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्याची व्यवस्थाही करण्यात येणार आहे. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आरोग्य विभागासाठी स्वतंत्र डिजिटल प्लॅटफॉर्म आणि अनुपस्थित डॉक्टरांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेण्याची सूचना केली. या सूचनांची आबिटकर यांनी दखल घेतली आहे.'निरोगी महाराष्ट्र-सुदृढ महाराष्ट्र' या संकल्पनेत नागरिकांचा सहभाग वाढवून दर्जेदार आरोग्य सेवा देण्याचा विभागाचा प्रयत्न राहील, असे आबिटकर यांनी सांगितले.

# महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर

## २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर आयोजन

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर" (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे असून मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सेक्युअर टूमारो (Save Soil, Save Water, Secure Tomorrow) अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात २१ ऑगस्ट रोजी कमाल ३ किलोमीटर (महा वॉकेथॉन) चालणे आणि मृद व जलसंधारणाची शपथ घेणे असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान "जलसंधारण अभियान" आयोजित करण्यात येत आहे. तर २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे आयोजन करुन जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले असून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या लोकचळवळीत राज्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे होणार असून प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रमुख जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी हे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री, राज्यसभा/ लोकसभा/ विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/उपाध्यक्ष, सर्व महापौर / उपमहापौर, सर्व नगराध्यक्ष/ उपनगराध्यक्ष, सर्व जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य, सर्व महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत सदस्य आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील नामांकित व प्रतिष्ठित व्यक्ती / डॉक्टर / कलाकार/ उद्योजक, जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब सदस्य, लायन्स क्लब सदस्य, रनिंग क्लब सदस्य, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, विविध व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला, राज्याचे नागरिक यांना सहभागी करण्यात येणार आहे.

**क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी**

महा वॉकेथॉन मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सोशल मीडियासाठी #MahaWalkathon, #WalkForWater, #SaveSoilSave Water हे हॅशटॅग वापरण्यात याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

**जलसंधारण सप्ताह**

१५ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन रील्स स्पधार्चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करुन इनस्टाग्राम (Instagram) च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी "Reel for Soil and Water Conservatioa" स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे. याची थीम Save Soil, Save Water, Secure Tomorrow अशी असून सोशल मीडियावर #SaveSoil Save Water हे हॅशटॅग वापरण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे एकाच हॅशटॅगखाली विक्रमी संख्येने रील्स तयार होऊन मोठ्या डिजिटल सहभागाची नोंद होणार आहे.

रील स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचा पात्र वयोगट १५ ते ३० वर्षे असा ठेवण्यात आला आहे. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची Instagram Reel तयार करावी. व्हिडीओ/ रीलच्या सुरुवातीला व्हिडीओ / रीलचा उद्देश, स्वतःचे संपूर्ण नाव, जिल्ह्याचे नाव नमूद सहभागी स्पर्धकांनी करणे आवश्यक आहे. स्पर्धकांने Reel स्वतःच्या Public Instagram Account वर पोस्ट करावी. स्पर्धकांनी मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत Instagram Account ला Tag करणे बंधनकारक राहील. यासाठी अधिकृत हॅशटॅग #Save Soil Save Water वापरणे अनिवार्य राहणार आहे. स्पर्धेसाठी मान्यता दिलेला एक अधिकृत QR Code तयार करण्यात येईल. QR Scan केल्यानंतर नोंदणी Reel Link Submit जिल्हा निवड→ Verification → सहभाग प्रमाणपत्र अशी सोपी प्रक्रिया असणार आहे. Instagram हॅशटॅगबरोबर स्वतंत्र डिजिटल नोंदणी केल्यामुळे शासनाकडे प्रत्येक सहभागीची अधिकृत नोंद उपलब्ध राहणार आहे. रील्स अपलोड करण्याचा कालावधी १५ ते २१ ऑगस्ट २०२६ असा आहे.

रील्स बनवण्यासाठी विषय

माती संवर्धन, पाणी बचत, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जलसंधारण पद्धती, माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना, आजचे संवर्धन उद्याचे सुरक्षित भविष्य असे रील्स बनवण्यासाठी विषय देण्यात आले आहेत.

रील्स बनविताना Storytelling, Acting, Music, Dance, Animation, AI Creative, Comedy, Short Film, Before-After, Drone Visuals किंवा अन्य नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करता येणार आहे. मात्र रीलचा मुख्य संदेश माती आणि पाणी संवर्धनाशी संबंधित असणे आवश्यक राहणार आहे.

रील्स करिता गुणांकन पद्धती पुढील प्रमाणे असणार आहे. विषय व संदेश - ३० गुण, कल्पकता -२५ गुण, प्रभावी सामाजिक संदेश - २० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता - १५ गुण, Instagram Engagement - १० गुण असे एकूण - १०० गुण असणार आहेत. केवळ Likes किंवा Followers वर विजेता निश्चित न करता तज्ज्ञ परीक्षण आणि Social Media Engagement या दोन्हींचा समतोल ठेवण्यात येणार आहे. गुणांकानुसार विजेत्याची निवड करण्यात येईल.

संपूर्ण राज्यासाठी एकच अधिकृत हॅशटॅग #SaveSoilSaveWater वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्स आणि राज्यभरातून १० हजार रिल्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रील स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार ₹२५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार ₹१५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार ₹१० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष 'युवा मृद-जलदूत' म्हणून गौरविण्यात येणार आहे

"एक Reel... मातीसाठी !, एक Reel... पाण्यासाठी !, एक Reel... सुरक्षित भविष्यासाठी !" हा रील्स प्रचारासाठी मुख्य संदेश आहे.

**जलसंधारण अभियान**

या स्पधेसीबतच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या जलसंधारण अभियानादरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा (जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचे महत्व, जल है तो कल है, जलसंवर्धन उपाय, घरातील पाण्याचा वापर - Water Budget), चित्रकला / पोस्टर स्पर्धा- जलसंवर्धन उपाय, पाणी बचत उपाय, Rainwater Harvesting., वाद-विवाद स्पर्धाः (विषय- जलसंधारण शासनाची जबाबदारी कि जनतेची जबाबदारी, इतर विषय), एक शाळा- एक शोषखड्डा उपक्रम राबविणे, सर्व शाळांमध्ये पाणी बचतीचे महत्व विद्यार्थांना सांगणे., जलमित्र / जलदूत घोषित करणे, २१ ऑगस्ट रोजी शाळेत माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करणे, २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ घेणे, २१ ऑगस्ट रोजी प्रमाणपत्र / सन्मानचिन्हे / पुरस्कार वितरण करणे, २१ ऑगस्ट रोजी गावातील किंवा शहरातील जलतज्ज्ञ/प्रतिष्ठीत व्यक्ती यांना प्रमुख पाहूणे म्हणून आमंत्रित करणे असे कार्यक्रम घेण्यात यावेत.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना २६ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्हे देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मृद व जलसंधारण विभागाचे पुढील सोशल मीडिया अकाऊंट आहेत.

Instagram - https://www.instagram.com/mahawalkathon2026/?hl=en
Facebook - https://www.facebook.com/mahawalkathon2026/
Twitter- https://x.com/MahaWalkathon26

**संकलन - गजानन पाटील,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

# महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर

## २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर" (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे असून मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सीक्यूर टूमारो ( Save Soil, Save Water, Secure Tomorrow) अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात २१ ऑगस्ट रोजी कमाल ३ किलोमीटर (महा वॉकेथॉन) चालणे आणि मृद व जलसंधारणाची शपथ घेणे असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यभर जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार आहे. शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान "जलसंधारण सप्ताह" आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान "जलसंधारण अभियान" आयोजित करण्यात येत आहे. तर २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत "महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर" (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे आयोजन करुन जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले असून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या लोकचळवळीत राज्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

**क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी**

राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे होणार असून प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रमुख जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी हे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री, राज्यसभा/ लोकसभा/ विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/ उपाध्यक्ष, सर्व मा. महापौर / उपमहापौर, सर्व नगराध्यक्ष/ उपनगराध्यक्ष, सर्व जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य, सर्व महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत सदस्य आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील नामांकित व प्रतिष्ठीत व्यक्ती / डॉक्टर / कलाकार/ उद्योजक, जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब सदस्य, लायन्स क्लब सदस्य, रनिंग क्लब सदस्य, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, विविध व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला, राज्याचे नागरिक यांना सहभागी करण्यात येणार आहे.

महा वॉकेथॉन मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सोशल मीडियासाठी #MahaWalkathon, #WalkForWater, #SaveSoilSave Water हे हॅशटॅग वापरण्यात याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोलापूरकरांनी जाणून घेतले सापांचे विश्व!

## इको फ्रेंडली क्लब आणि नाग फाउंडेशनचा उपक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागपंचमीच्या निमित्ताने सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने इको फ्रेंडली क्लब आणि नाग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्मृती वन उद्यान येथे 'सापांचे विश्व' या विषयावर विशेष जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला.

सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वनाधिकारी लक्ष्मण आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक, वसुंधरा मित्र परशुराम कोकणे यांनी केले, तर वनपाल महेश हिरेमठ यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या उपक्रमात सर्पतज्ज्ञ राहुल शिंदे यांनी सापांचे निसगार्तील महत्त्व आणि त्यांच्याविषयीच्या रंजक बाबींची माहिती दिली. लहान मुलांसह मोठ्यांनीही अत्यंत कुतूहलाने विचारलेल्या प्रश्नांमुळे सापांविषयीचे अनेक गैरसमज दूर होण्यास मदत झाली. प्रबोधन सत्रानंतर उपस्थितांनी सहकुटुंब वनभोजनाचा आनंद घेतला.

या कार्यक्रमाला नाग फाउंडेशनचे अनिल अलदार, शिवा मुनोळी, सुनील अरळीकट्टी, शंतनू पुंडा, शिव कानकुर्ती, विजय खांडेकर, रवीकुमार अकेन, अजय हिरेमठ, गणेश पवार, आदित्य गायकवाड, करण हगलगुंडे, सम्राट कुमरी तसेच इको फ्रेंडली क्लबचे समन्वयक अजित कोकणे, प्रा. भिमगोंडा पाटील, अंजली अंबीगार, सिद्धेश कल्याणशेट्टी, रोहित बलसुरे, चंद्रकांत जवळकोटे, प्रा. शिवकुमार राऊतराव, योगिता चाबुकस्वार, पद्मकांत घंटे, जय हंचाटे, सनी पाटील, संतोषकुमार तडवळ, डॉ. प्रवीण बिरगे, सरस्वती कोकणे, महेश स्वामी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चित्रपट आणि टीव्ही मालिकांच्या माध्यमातून सापांविषयी समाजात मोठे गैरसमज निर्माण करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात साप दूध पीत नाही, तसेच सापाला कान नसल्याने आवाज ऐकू येत नाही. निसर्गात आढळणारे सगळेच साप विषारी नसतात. त्यामुळे कुठेही साप दिसल्यास घाबरून न जाता किंवा त्याला न मारता त्वरित सर्पमित्रांशी संपर्क साधावा. स्वतःचा बचाव करत सापांचे प्राण वाचवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे."

**— राहुल शिंदे,**
सर्प अभ्यासक

# केशवनगर-खराडी उड्डाणपुलाला अजितदादांचे नाव द्या- रोहन सुरवसे पाटील

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** केशवनगर-खराडी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या उड्डाणपुलाचे रविवारी केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर हा उड्डाणपूल नागरिकांसाठी खुला करण्यात आला.

दरम्यान, या उड्डाणपुलाला दिवंगत अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहन सुरवसे पाटील यांनी केली आहे.



याबाबत त्यांनी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांना निवेदन दिले आहे.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अजितदादा पवार यांनी पायाभूत सुविधा आणि वाहतूक प्रकल्पांना प्राधान्य दिले. त्यांच्या विकासाभिमुख कायार्ची आठवण कायम राहावी, या उद्देशाने उड्डाणपुलाला त्यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या उड्डाणपुलाची लांबी सुमारे ४११ मीटर असून रुंदी २४ मीटर आहे. पुलावरून दोन्ही दिशेने वाहतूक सुरू राहणार आहे.

अजितदादांच्या पुणे शहराच्या विकासातील योगदानाचा सन्मान म्हणून उड्डाणपुलाचे दिवंगत 'अजितदादा पवार उड्डाणपूल'असे नामकरण करण्यात यावे, अशी मागणी रोहन सुरवसे पाटील यांनी केली आहे.

## वात्रटिका

**दणका, नोटीस**

त्याची चव त्यांनाच माहीत
पण ते जाहिरात करतात...
पैसे त्यांना मिळतात आणि
लोक अनुकरण करतात...
पान नाही पण मसाला रंगला
आणि नोटिसीचा बडगा लागला...
जाहिरात कशाचीही कोण करतो
आणि फायदा होतो कोणाला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ‘ईच्छा भगवंताची’ परिवाराकडून आ.अनिकेत तटकरे यांचा सोलापूरी पद्धतीने सन्मान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधान परिषदेवर नुकतीच बिनविरोध निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार गट) आमदार अनिकेत सुनील तटकरे यांचा ‘ईच्छा भगवंताची’ परिवाराच्या वतीने सोलापुरी पद्धतीने सन्मान करण्यात आला. सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २२ चे भाजप नगरसेवक किसन जाधव यांनी रायगड येथील गीता बाग, सुतारवाडी येथील तटकरे यांच्या निवासस्थानी जाऊन हा सत्कार केला. यावेळी किसन जाधव यांनी अनिकेत तटकरे यांना ‘अस्सल सोलापुरी आमदार’ असा उल्लेख असलेला फेटा बांधून भला मोठा पुष्पहार घातला. तसेच अस्सल प्रसिद्ध सोलापुरी चादर भेट देण्यात आली. विशेष आकर्षण ठरलेल्या या सोलापुरी चादरीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विधान परिषद आमदार अनिकेतभाई तटकरे यांना पेढा भरवत असतानाचा, तसेच खासदार सुनील तटकरे आणि महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांचा एकत्रित फोटो प्रतिमा स्वरूपात विणण्यात आला होता. ही आगळीवेगळी प्रतिमा पाहून आमदार अनिकेतभाई तटकरे भारावून गेले. सोलापुरी चादरीला जगभरात वेगळी ओळख आहे. अशा जगप्रसिद्ध सोलापुरी चादरीवर आपल्या कुटुंबाचा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचा हा विशेष क्षण प्रतिमेच्या माध्यमातून जतन करून भेट दिल्याबद्दल किसन जाधव यांचे त्यांनी आभार मानले. सोलापूरच्या कलेची आणि सोलापुरी चादरीची ओळख अशा पद्धतीने जपल्याबद्दल त्यांनी कौतुकही केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा खासदार सुनील तटकरे यांचाही शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन किसन जाधव यांनी सत्कार केला. किसन जाधव हे पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रिय होते. अलीकडील निवडणुकीत त्यांनी भाजपकडून निवडणूक लढवून नगरसेवक म्हणून विजय मिळविला. मात्र पक्ष बदलला असला तरी तटकरे परिवाराशी असलेले जुने ऋणानुबंध त्यांनी कायम जपले आहेत. त्यामुळे हा सत्कार कोणत्याही पक्षीय राजकारणापलीकडे कौटुंबिक जिव्हाळा आणि जुन्या ऋणानुबंधांचा सन्मान म्हणून करण्यात आला. याप्रसंगी युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड, माणिक कांबळे, अजय बिरवटकर, हुलगप्पा शासम, पवन बेरे, वैभव प्रचंडे, वसीम रंगरेज आदींची उपस्थिती होती. यावेळी किसन जाधव यांनी खासदार सुनील तटकरे यांना सोलापूर शहराच्या विकाससंदर्भातील काही निवेदनेही दिली. महायुतीच्या माध्यमातून सोलापूर शहराचा सर्वांगीण विकास होत असून, आगामी काळातही सोलापूरच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची भूमिका राहील, असे खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी सांगितले.

# देशाच्या विकासात तरुणाने प्रामाणिकपणे योगदान द्यावे- मुकुंद पत्की



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** देशाची एकता, अखंडता, लोकशाही आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. जात, धर्म, भाषा आणि प्रांत यांच्यातील भेद विसरून आपण राष्ट्रहिताला प्राधान्य दिले पाहिजे तसेच आपल्या.कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करून देशाच्या विकासात प्रामाणिकपणे योगदान दिले पाहिजे असे सांगून कार्यक्रमाचे सुनियोजन पाहून सांस्कृतिक विभागाचे तोंड भरून कौतुक केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील सर्व शैक्षणिक शाखांच्या वतीने आयोजित केलेल्या भारताच्या ८० व्या स्वतंत्र दिनानिमित्त मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष भीमराव साठे, माजी प्राचार्य एम ए शेख, संचालिका सौ शांभवीताई कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती,संचालक अशोक येणगुरे, जुनिअर विभाग प्रमुख सौ पुनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राथमिक चे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेमी विभागाचे दिगंबर जगताप, बापूजी निंबाळकर, खंडेराव घाटगे, शिवानंद पुजारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सिद्धाराम जमादार हा विद्यार्थी धावणे व लांब उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून थोर नेत्यांचे स्मृती जागृत केल्या. यावेळी लोकमान्य टिळक, झाशीची राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, डॉ बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल आदी क्रांतिकारकांच्या वेशभूषा केलेले नर्सरी वगातील चिमुकले विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु सिद्धी बाबर व वेदांती मसलेकर या विद्यार्थिनी केल्या तर आभार ज्येष्ठ शिक्षिका सांस्कृतिक विभाग प्रमुख कल्पना स्वामी यांनी मानले.

ध्वजारोहण प्रसंगी संगीताच्या सुमधुर स्वराने सर्व विद्यार्थ्यांनी संपूर्ण वंदे मातरम गायन, राष्ट्रगीत, राज्यगीत व झेंडागीत संगीत शिक्षक मयूर स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले.

# रेड ॲपल फर्निचर आता सोलापूरात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** फर्निचर क्षेत्रात अत्यंत नावाजलेले महाराष्ट्रातील एकमेव ब्रँड म्हणजे रेड एप्पल फर्निचर होय. या देशांतर्गत ब्रँडच्या फर्निचर च्या फॅक्टरी आउटलेट चा शुभारंभ सोलापूरचे खासदार आदरणीय प्रणिती ताई शिंदे यांच्या हस्ते फीत कापून व पारंपरिक पद्धतीने पूजा करून करण्यात आले असल्याचे मुख्य व्यवस्थापक अब्दुल रऊफ बेंनिशेरूर यांनी सांगितले.

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील टीडीएफ ऑफीस शेजारी असलेल्या रेड एप्पल फर्निचरच्या कंपनी आउटलेट चा शुभारंभ करण्यात आला. या वेळी भाजपा शहर अध्यक्ष रोहिणी ताई तडवळकर, एमआयएमचे लतीफ शाब्दि, मुश्ताक बेन्नीशेरूर आदी उपस्थित होते.

रेड एप्पल फर्निचर संदर्भात सांगताना अब्दुल रऊफ म्हणाले की रेड ॲपल फर्निचर चे एकूण राज्यभरात 18 शोरूम्स 250 डीलर्स आणि ग्राहकांचा पंचवीस वषार्चा प्रचंड विश्वास त्यांच्यासोबत आहे शिवाय पाच लाख आनंदी ग्राहक जोडले गेलेले आहेत. या देशांतर्गत रेड ॲपल फर्निचर शोरुम मध्ये जवळजवळ 100 बेडरूम सेट आणि डायनिंग सेट तसेच शंभर प्लस ऑफिस फर्निचर डिझाइन्स उपलब्ध आहेत.

ज्या ग्राहकांना सोफा ऑर्डर देऊन बनवायचा आहे त्यांच्यासाठी 300 प्रकारचे सोफा नमुने उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. सोलापुरातील रेड एप्पल फर्निचर या फॅक्टरी आउटलेटच्या उद्घाटनानिमित्त त्यांनी जोरदार ऑफर दिली असल्याचे सांगितले यामध्ये 60% पर्यंत डिस्काउंट देणार असून ही ऑफर 15 ऑगस्ट चे ते 30 ऑगस्ट पर्यंत चालणार असल्याचे त्यांनी सांगितले या ऑफरचा सोलापूर शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी कार्यक्रमाचे निमंत्रक विजय दरगड, मुस्ताक बिन्नीशिरूर, अमोल मुंदडा, राहुल करवा, राजेंद्र करवा आदींनी आलेल्या पाहुण्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. कार्यक्रमाची प्रस्तावना अब्दुल रऊफ बेंनिशेरूर यांनी केले. तर आभार अतिफ बेंनिशेरूर आणि अमोल मुंदडा यांनी मानले. कार्यक्रमास सोलापूर शहर व जिल्ह्यातील व्यापारी मित्रपरिवार व पाहुणेमंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# न्यासाच्या विकास कार्यात दूरदृष्टी पाहायला मिळाले - श्रीकांत देशपांडे

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या विकास कार्यात दूरदृष्टी पाहायला मिळाल्याचे मनोगत माजी शिक्षक आमदार श्रीकांत देशपांडे यांनी व्यक्त केले.



ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी सौरभ शामराव मोरे हे उपस्थित होते.

यावेळी अतिश पवार, स्वामिनाथ बाबर, रोहन शिर्के, शहाजी यादव, एस.के.स्वामी, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, संतोष माने, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, दत्ता मोरे, किरण साठे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# अकलूज शाखेच्या नाट्यप्रवासाची मध्यवर्तीकडून दखल; २०१४ ते २०२६ च्या कार्याचा गौरव



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील नाट्य चळवळीला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी तसेच राज्यभरातील शाखांशी थेट संवाद साधून त्यांच्या कायार्चा आढावा घेण्यासाठी मध्यवर्ती शाखेच्या वतीने राज्यव्यापी शाखा निरीक्षण व संवाद दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दौऱ्याअंतर्गत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबईचे उपाध्यक्ष नरेश गडेकर आणि कोषाध्यक्ष सतीश लटके यांनी अकलूज शाखेला भेट देऊन शाखेच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला.

अकलूज शाखेच्या वतीने सन २०१४ ते २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या विविध नाट्यविषयक उपक्रमांची, सांस्कृतिक कार्यक्रमांची तसेच स्थानिक कलाकार व रंगकर्मींना उपलब्ध करून दिलेल्या व्यासपीठाची माहिती मध्यवर्ती पदाधिकाऱ्यांना देण्यात आली. गेल्या बारा वर्षांच्या कालखंडात अकलूज शाखेने नाट्य क्षेत्राशी असलेली आपली नाळ कायम ठेवत विविध उपक्रमांच्या माध्यमातून नाट्य चळवळ पुढे नेण्याचे काम केले आहे. या कायार्ची माहिती जाणून घेतल्यानंतर मध्यवर्ती पदाधिकाऱ्यांनी अकलूज शाखेच्या कार्याची विशेष दखल घेतली.

यावेळी बोलताना उपाध्यक्ष नरेश गडेकर म्हणाले, ‚महाराष्ट्रातील नाट्य शाखांशी संवाद साधण्यासाठी हा संवाद दौरा आहे. मध्यवर्ती शाखा आणि इतर शाखांचे नाते हे वडील आणि मुलाचे आहे. शाखांना त्यांच्या कार्यात येणाऱ्या अडचणी समजून घेणे, त्यांना मार्गदर्शन करणे आणि नाट्य शाखांचा विस्तार करण्यासाठी आवश्यक ती मदत करणे, ही मध्यवर्ती शाखेची जबाबदारी आहे. शाखांचा विस्तार करण्यासाठी पाहिजे ती मदत मध्यवर्ती शाखेकडून केली जाईल. ग्रामीण भागातील नाट्य चळवळीला बळ देण्यासाठी स्थानिक शाखांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचेही गडेकर यांनी सांगितले. शहरांपुरती नाट्य चळवळ मर्यादित न राहता तालुका व ग्रामीण भागातील कलाकार, लेखक, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि नाट्यप्रेमींना योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिक शाखांनी सातत्याने उपक्रम राबवावेत आणि मध्यवर्ती शाखेने त्यांना आवश्यक सहकार्य करावे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

कोषाध्यक्ष सतीश लटके यांनीही अकलूज शाखेच्या कार्याची माहिती घेत शाखेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. शाखेने आतापर्यंत केलेल्या कामाबरोबरच आगामी काळात नाट्य क्षेत्रातील नव्या पिढीला जोडण्यासाठी अधिकाधिक उपक्रम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. स्थानिक कलाकारांना संधी देणे, नाट्य प्रशिक्षण, कार्यशाळा, स्पर्धा आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून शाखेचे कार्य अधिक व्यापक करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

या भेटीदरम्यान अकलूज शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी अकलूज शाखा अध्यक्ष खासदार धैर्यशील मोहिते पाटील, कार्यकारणी सदस्या सौ.शीतलदेवी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाखेच्या आजपर्यंतच्या वाटचालीची माहिती, आगामी उपक्रमांचे नियोजन तसेच नाट्य क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबी मध्यवर्ती पदाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. मध्यवर्ती पदाधिकाऱ्यांनी शाखेच्या अडचणी जाणून घेत भविष्यात आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

मध्यवर्ती पदाधिकाऱ्यांच्या या भेटीमुळे अकलूज शाखेतील पदाधिकारी, कलाकार व नाट्यप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात अकलूज परिसरातील नाट्य चळवळीला आणखी व्यापक स्वरूप देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी सिनेअभिनेते व उपाध्यक्ष अजय तपकीरे, मुख्य कार्यवाह डॉ.विश्वनाथ आवड, सहकार्यवाह सुनील कांबळे, औदुंबर भिसे, कोषाध्यक्ष अमोल खरात, कार्यकारणी सदस्य शिवदत्त नारायणकर, नितीन बनकर, अनिल जाधव, अमित पुंज, श्रीकांत राऊत, लाला मुजावर, मनोज वर्धम, वैभव आंबेकर यांच्यासह पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

# शिखर पहारिया फाउंडेशनतर्फे 3 डिजिटल टीव्हीची भेट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मागास समाजसेवा मंडळ संचलित जय जवान जय किसान मुलांची सैनिकी शाळा व ज्युनिअर कॉलेज, सोलापूर येथे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने 3 डिजिटल टीव्हीची भेट देण्यात आली.

या डिजिटल सुविधांचे उद्घाटन फाउंडेशनचे कार्यकर्ते राज सलगर, धर्मराज गुंडे, आसिफ चौधरी, तनवीर शेख, तुषार जोगधनकर, कौशल शिंदे व फुरकान मनियार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्हिडिओ, चित्रे, नकाशे, ॲनिमेशन तसेच विविध डिजिटल शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे अध्ययन करता येणार आहे. यावेळी राज सलगर यांनी विद्यार्थ्यांनी डिजिटल साधनांचा योग्य व विधायक वापर करावा. तुमच्यासाठी आम्ही नेहमीच मदतीला धावून येऊ. शाळेला लाभलेल्या सुविधांचा योग्य उपयोग करा, मन लावून शिका आणि जीवनात मोठे व्हा, असे आवाहन केले.धर्मराज गुंडे यांनी डिजिटल बोडार्चा जास्तीत जास्त शैक्षणिक उपयोग करून विद्यार्थ्यांनी ज्ञान संपादन करावे. डिजिटल माध्यमांचा वापर अध्ययन अधिक सोपे, रंजक आणि परिणामकारक करण्यासाठी करावा, असे सांगितले.

यावेळी सर्व प्रमुख अतिथींचा शाळेचे प्राचार्य रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. प्राचार्य रविंद्र चव्हाण व कमांडंट अशोक कुमार मंचंदा यांनी फाउंडेशनच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण यांनीही शिखर पहारिया फाउंडेशनने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या या मोलाच्या योगदानाबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन वनिता नेवसे यांनी केले, तर अर्चना नागणे यांनी आभार प्रदर्शन केले.


## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र


**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779

### CHANGE IN NAME

I am changing my name from **MUMTAZ BI ABDUL AZIZ** To **MUMATAJ ABDULAJIJ NADAF** for passport issuance as per document.


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) लगेच उत्तर देणारा, वेळ न दवडता उत्तर देणारा २) धनी ३) सन उलट लिहा ४) सर्कशीतील विदूषक, पत्त्यातील एक पान ५) अंगावरील छोटा काळा ठिपका ६) पावा, मुरली ७) दुर्ग, किल्ला ८) महाराष्ट्रातील एक देशपातळीवरील नेते १२) लोकांचा समूह १३) हाताच्या चपळतेने फसविणे, ***** करणे १५) मोठे, उज्वल असे यश १६) एक रास २३) कमा उलट लिहा २५) राज्याचे माजी मुख्यमंत्री, सध्या केंद्रीय मंत्री- **** राणे २६) टीव्ही सिरीयल निर्माती-*** कपूर २७) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे २८) बे दुणे ३१) साईबाबांचा एक संदेश-*** मालिक एक ३२) लाकडाचे गोदाम ३३) मावशीचा मुलगा ३४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ३५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ३७) तल्लीन, मग्न होणे ३९) जंगल, अरण्य ४३) एकाग्र, मग्न होणे ४४) एक अभिनेते-*** दामले ४६) फळातील गोड द्रव ४८) सूर्य (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) श्रीरामाचा परमभक्त, वायुपुत्र ४) कोल्हापूर जिल्ह्यातील एक प्रसिध्द दैवत ७) श्री गजाननाचे एक नाव ९) लहान बाळाला ही टोचतात १०) मंदिराच्या शिखरावर हा बसवितात ११) परीट, धोबी १३) पराजय, जीतच्या विरूध्दार्थी १५) रांग १६) दम उलट लिहा १७) खर्चच्या विरूध्दार्थी १८) चार आणि तीन मिळून होणारी संख्या १९) आमीर खान अभिनीत एक चित्रपट-* इडियटस् २०) विश्वचषक (इंग्रजीत) २१) चाळीस आणि बारा मिळून होणारी संख्या २२) एक पेय, टी (मराठीत) २३) एक मराठी महिना २४) याच्यापासून शिरा बनवितात २५) गटर २६) सात गुणिले तीन २९) रक्षाबंधनवेळी बहीण भावाला बांधते ती ३०) एक जंगली हिंस्त्र पशु ३२) लग्नातील नवऱ्या मुलाची आई ३४) रांग, लाईन (हिंदीत) ३६) या कंपनीचे च्यवनप्राश प्रसिध्द आहे ३८) उन्हातान्हात भटकणे, **** फिरणे ४०) एक म्हण- दाम करी ** ४१) श्रीमंत (हिंदीत), शाहरूखचा एक हिंदी चित्रपट ४२) बनावट ४४) रयत, जनता, एक म्हण- जसा राजा तशी ** ४५) बोझा, वजन ४७) एक (इंग्रजीत) ४८) उत्सवाचा दिवस ४९) पर्जन्य ५०) निवडणुकीत उमेदवाराला मत देणे

## सुडोकु - 32

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | | 2 | 8 | | | | |
| | 4 | | | 9 | | | | 8 |
| | 3 | 8 | | 5 | 7 | 4 | 9 | |
| | | | 6 | 7 | 2 | | 3 | |
| | 1 | | 5 | 4 | | | | |
| | 5 | | 8 | 3 | | 6 | | |
| 8 | | | | 1 | | 9 | 6 | 2 |
| | | 4 | 7 | 6 | | 1 | | 5 |
| | 6 | 5 | 9 | | | 3 | | 4 |

# मी कोणाच्या वाट्याला जात नाही, छेडाल तर उत्तर देईन

## श्रमिक पत्रकार संघाच्या वार्तालापात पालकमंत्री गोरे यांची रोखठोक भूमिका

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरच्या विकासाचे रखडलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन पातळीवर सातत्याने पाठपुरावा सुरू असून, विमानसेवा, टेक्सटाईल पार्क, आयटी पार्क, एमआयडीसी विस्तार, पायाभूत सुविधा आणि पर्यटन विकासाला प्राधान्य दिले जात आहे. विकासाच्या प्रश्नांवर राजकारण न करता सर्वांनी एकत्र काम करण्याची गरज असल्याची भूमिका पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मांडली.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित सत्कार व वातार्लाप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, नगरसेवक मनीष केत, संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे उपस्थित होते. प्रास्ताविक विक्रम खेलबुडे यांनी केले.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पालकमंत्री म्हणून १८ महिने पूर्ण झाले असून, समांतर जलवाहिनी, विमानसेवा, उड्डाणपूल, टेक्सटाईल पार्क यांसारखे अनेक प्रश्न पुढे आले. टेक्सटाईल पार्कचा प्रश्न मार्गी लागल्याने सुमारे १० हजार कुटुंबांना फायदा होणार आहे. सोलापूरची गुंतवणूक वाढविण्यासाठी एमआयडीसीचा विस्तार, आयटी पार्क आणि वस्त्रोद्योगाला नव्या सवलती देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बोरामणी विमानतळाच्या प्रश्नावर बोलताना विद्यमान विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी ८०० ते १ हजार कोटी, तर बोरामणीसाठी सुमारे ६०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहेत. माळढोक पक्ष्याच्या अस्तित्वाबाबत वन विभागाचा अहवालही महत्त्वाचा ठरणार



असून, विमानतळाबाबत सरकार तातडीने निर्णय घेण्याच्या विचारात असल्याचे ते म्हणाले.

आदिला नदीच्या ब्लू व रेड लाईनच्या प्रश्नावर नागरिकांना दिलासा देताना, एकाही घरावर हातोडा पडू देणार नाही मात्र नव्याने बांधकाम करताना काळजी घ्यावी. नदी-नाल्याचा प्रश्न सोडवून शहराचा विकास करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या सात जागा बीओटीवर विकसित करण्याच्या प्रस्तावाचे समर्थन करताना, निष्क्रिय जागांचा विकास करून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याची गरज आहे. काम होण्याआधी ते कायदेशीर की बेकायदेशीर ठरविण्याचा अधिकार कोणाला? असा सवालही त्यांनी केला.

प्रधानमंत्री आवास योजनेत महाराष्ट्रात एका वर्षात साडेपाच लाख घरे पूर्ण झाली असून, आता १५ लाख घरांचे उद्दिष्ट असल्याचे गोरे यांनी सांगितले. सोलापूरसह राज्यातील महिलांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद मॉल उभारले जाणार असून, पहिल्या टप्प्यात १३ मॉलचे काम सुरू होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केले. सूत्रसंचालन महाराष्ट्र राज्य अधिस्वीकृती पत्रकार समितीचे सदस्य प्रमोद बोडके यांनी केले. आभार सरचिटणीस सागर सुरवसे यांनी मानले.

**विनाकारण छेडू नका, उत्तर द्यायलाही कमी पडणार नाही**

स्वतःवरील आरोपांवर गोरे यांनी आक्रमक भूमिका घेतली. आपल्यावर दाखल १८ गुन्ह्यांपैकी १५ प्रकरणांत निर्दोषत्व सिद्ध झाल्याचे सांगत, उर्वरित तीन प्रकरणांचा न्यायालयीन निकाल स्वीकारणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मी कोणाच्या वाट्याला जात नाही; मात्र विनाकारण छेडले तर उत्तर द्यायलाही कमी पडणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

# जवान वैभव आवताडे यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मंगळवेढा तालुक्यातील गणेशवाडी येथील लान्स नायक वैभव तात्यासो आवताडे यांच्यावर रविवार दि. 16 ऑगस्ट रोजी मूळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

सेवारत सैनिक नंबर 15735441ठ लान्स नायक आवताडे वैभव तात्यासो हे हेडक्वार्टर 15 ओ पी सिग्नल रेजिमेंटमध्ये कार्यरत होते. 14 ऑगस्ट 2026 रोजी कर्तव्यावर असताना गनशॉट वांड अपघात त्यांचे निधन झाले होते. त्यांचे पार्थिव आज सकाळी 09.00 वाजता मूळ गावी गणेशवाडी, ता. मंगळवेढा येथे आणण्यात आले.

जवानाच्या पार्थिवावर पोलीस दलाच्या तुकडीने शोकसलामी दिली. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कर्नल मिलिंद तुंगार, तहसीलदार मदन जाधव, पंचायत



समिती सभापती दिपाली ताड, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत, जिल्हा सैनिक कार्यालयाचे अप्पासाहेब कोडाग, पंढरपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रणिती भालके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशसेवेत प्राण अर्पण केलेल्या जवानाला शेवटचा निरोप देण्यासाठी संपूर्ण गाव हळहळले. जवान आवताडे यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.

# मनोरमा बँकेची वार्षिक सभा उत्साहात

## सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मनोरमा को-ऑप. बँक आणि मनोरमा मल्टीस्टेटची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली यावेळी बँकेच्या सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

शनिवारी, होटगी रस्त्यावरील हॉटेल बालाजी सरोवर येथे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली बँकेची तर मनोरमा मल्टीस्टेटची सभा चेअरमन शोभा मोरे यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार पडली.व्हाईस चेअरमन संतोष सुरवसे, डॉ. सुमित मोरे, डॉ. मिताली मोरे, डॉ. ऋचा पाटील, डॉ. आदित्य पाटील, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन अ‍ॅड. सुरेश गायकवाड, संचालक सुहास भोसले, गणपत कदम, सत्यवान वाघचौरे, डॉ. सत्यजित वाघचौरे, दत्तामामा मुळे, संतोष मोटे, सीए मोईनुद्दीन नदाफ, प्रशांत शहापूरकर तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

प्रारंभी भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, महापालिकेतील सभागृह नेते नरेंद्र काळे, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत जोशी आणि संचालकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सभेची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी यांनी बँकेच्या कामकाजाचा अहवाल सभेसमोर सादर केला. सभेतील विविध विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली डॉ. ऋचा पाटील यांनी विषयाचे वाचन करताना सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर केला.

मनोरमा बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर मनोरमा मल्टीस्टेटची सर्वसाधारण सभाही याच ठिकाणी पार पडली. यावेळी चेअरमन शोभा मोरे, संचालक मंडळाचे सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कविता कुलकर्णी यांच्यासह पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

**किरण माने यांना जीवनगौरव**

मनोरमा साहित्य मंडळी, मनोरमा बँक परिवार आणि मनोरमा मल्टीस्टेट परिवाराच्या वतीने सिनेअभिनेते व नाट्यकलाकार किरण माने यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. एक लाख रुपयांचा रोख धनादेश, सन्मानचिन्ह, स्मृतिचिन्ह आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

# सोलापूर महानगरपालिका भाड्याने देणार का? संभाजी ब्रिगेडचा सवाल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरचे उत्पन्न वाढवण्याच्या नावाखाली शहरातील मोक्याच्या सात जागा बीओटी (BOT) तत्त्वावर देण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप करत संभाजी ब्रिगेडने या निर्णयाला तीव्र विरोध करून सोलापूर महानगरपालिकेच्या इमारतीसमोर महानगरपालिका भाड्याने देणार आहेत का? असा बॅनर लावून महानगरपालिका महापौर व सर्व पदाधिकारी यांनी सोलापूर महानगरपालिकेची उत्पन्न वाढवण्यासाठी शहरातील मोक्याच्या जागा भाड्याने देण्याच्या निर्णयचा तीव्र निषेध केला आहे.



महानगरपालिकेच्या मालकीच्या महत्त्वाच्या जागा दीर्घकाळासाठी खासगी विकासकांच्या ताब्यात देण्याऐवजी त्या जागांचा उपयोग महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी पारदर्शक पद्धतीने करावा, अशी भूमिका संभाजी ब्रिगेडने घेतली आहे.

'सोलापूरचे उत्पन्न वाढवण्याच्या नावाखाली मोक्याच्या जागा बीओटीवर देणार असाल, तर उद्या सोलापूर महानगरपालिकाच भाड्याने देणार का?' असा थेट सवाल संभाजी ब्रिगेडने महानगरपालिका प्रशासनाला केला आहे.

जर महानगरपालिका पदाधिकाऱ्यांच्या हेतू सोलापूर महापालिका चे उत्पन्न वाढीसाठी असेल तर सर्वात प्रथम त्यांनी महानगर पालिकेच्या गाड्या कार्पोरेट ऑफिस, मानधन व इतर सुख सोयीचा त्याग करावा.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले वकील आघाडी जिल्हाध्यक्ष गणेश कदम जिल्हा उपाध्यक्ष फिरोज सय्यद जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले सचिव रमेश चव्हाण जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोंगरे जिल्हा कार्याध्यक्ष इर्शाद नागोरे शहर उपाध्यक्ष प्रशांत देशमुख उद्योग आघाडीचे शहराध्यक्ष संतोष सुरवसे रामेश्वर सोडके आधी उपस्थित होते.

# अक्कलकोटच्या पाणीपुरवठ्याला 'बूस्टर'

## वाढीव यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी कामांना वेग

**अक्कलकोट, (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट शहरातील पाणीपुरवठा अधिक सुरळीत आणि विनाअडथळा करण्यासाठी कुरनूर धरणातील जलउपसा यंत्रणेत वाढीव क्षमतेची पाईपलाइन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामासह जलशुद्धीकरण केंद्रातील सुरू असलेली कामे तातडीने पूर्ण करून वाढीव यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या सूचना नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी संबंधित ठेकेदारांना दिल्या.

कुरनूर धरणास भेट देऊन कल्याणशेट्टी यांनी जलउपसा यंत्रणेची पाहणी केली. धरणातील जलउपसा विहीर (इंटेक) ते नदीपात्रातील उद्धव विहीर (जॅकवेल) या दरम्यान सुमारे 72 मीटर लांबीची आणि अडीच फूट व्यासाची नवीन पाईपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाच्या प्रगतीचा आढावा घेताना येणाऱ्या अडचणींबाबत संबंधितांशी चर्चा करण्यात आली. उर्वरित काम कोणत्याही विलंबाशिवाय पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

त्यानंतर अक्कलकोट येथील जलशुद्धीकरण केंद्रास भेट देऊन तेथे सुरू असलेल्या कामांची माहिती



'अक्कलकोट शहरातील सध्या सुरू असलेला पाणीपुरवठ्याचा कालावधी कमी करण्यासाठी कुरनूर धरणातील इंटेक ते जॅकवेल दरम्यान मोठ्या व्यासाची पाईपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. तसेच जलशुद्धीकरण केंद्रातील कामांचीही तातडीने पाहणी करण्यात आली आहे. संबंधित ठेकेदारांना उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे वाढीव यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर शहराच्या पाणीपुरवठ्यातील अडथळे कमी होऊन नागरिकांना अधिक सुरळीत पाणी मिळण्यास मदत होईल.'

– **मिलन कल्याणशेट्टी,** नगराध्यक्ष, अक्कलकोट

घेण्यात आली. दोन्ही कामे पूर्ण झाल्यानंतर शहराचा पाणीपुरवठा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. सध्या सुरू असलेला पाणीपुरवठ्याचा कालावधी कमी करून नागरिकांना अधिक सुरळीत पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वाची आहेत.

कुरनूर धरणातील सद्यस्थितीतील पाणीसाठ्याचीही पाहणी करून शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने उपलब्ध जलस्रोताचा आढावा घेण्यात आला. संबंधित ठेकेदारांकडून कामाच्या प्रगतीची माहिती घेऊन आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी उपनगराध्यक्ष ऋतुराज राठोड, नगरपालिकेचे पक्षनेते यशवंत धोंगडे, पाणीपुरवठा सभापती देविदास कवटगी, पाणीपुरवठा अभियंता मनोज ईश्वरकट्टी आदी उपस्थित होते.

# तर सैन्यदलाकडेही विद्यार्थ्यांनी वळावे- खा. धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांनी केवळ मेडिकल आणि इंजिनिअरिंग या क्षेत्रांकडे न वळता कअर, क्ढर, सैन्यदल तसेच प्रशासकीय व संरक्षण क्षेत्रातील विविध संधींचा विचार करावा. विशेषतः अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सैन्यदलात सहभागी होऊन देशसेवेचा मार्ग स्वीकारावा असे मत माढा लोकसभा मतदार संघांचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केले. शिवरत्न स्कूल, मिलेनियम स्कूल आणि शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांची सलामी स्वीकारत त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांमध्ये देशसेवेची भावना, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी शालेय जीवनापासूनच




विविध क्षेत्रांची माहिती व योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्यदिनानिमित्त शैक्षणिक गुणवंत विद्यार्थ्यांना खासदार मोहिते-पाटील यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच वर्षभर १०० टक्के उपस्थिती नोंदविणाऱ्या शिक्षकांचाही त्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारामुळे कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण प्राप्त झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी एसएमपीचे प्राचार्य मॉन्सी मथाई यांनी स्वागतपर भाषण केले. शिवरत्न स्कूलचे प्राचार्य अल्बर्ट थारकन यांनी प्रस्तावना केली तर मिलेनियम स्कूलच्या प्राचार्या सौ. बिनो के. पॉलोस यांनी आभार मानले. यावेळी संस्थांचे संचालक, कमिटी मेंबर, विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी उत्स्फूर्त सहभागाने स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

# एनटीपीसी सोलापूर येथे ८०वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एनटीपीसी सोलापूर येथे ८०वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. या पवित्र प्रसंगी प्रशासकीय इमारत तसेच बालभवन येथे ध्वजारोहण करण्यात आले, तर सीसीआरमध्ये केक कापून स्वातंत्र्यदिनाचा आनंद साजरा करण्यात आला.

या निमित्ताने टाउनशिपमधील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम स्टेडियममध्ये भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि प्रकल्प प्रमुख मोहन वट्टेक्कट यांनी ध्वजारोहण करून उपस्थित विशाल जनसमुदायाला संबोधित केले. आपल्या भाषणात त्यांनी एनटीपीसी सोलापूरच्या उल्लेखनीय कामगिरीचे तसेच विविध विभागांच्या योगदानाचे कौतुक केले आणि एनटीपीसी तसेच राष्ट्राच्या प्रगतीमध्ये सातत्याने योगदान देण्यासाठी सर्वांना प्रेरित केले.



या समारंभाला शुभाशिस बंदोपाध्याय, महाव्यवस्थापक (प्रचालन व देखभाल), हेमंत कुमार शाक्य, महाव्यवस्थापक (प्रचालन व एफ.एम.), कन्हैया दास, महाव्यवस्थापक (मानव संसाधन), श्रीमती शैला मोहन, अध्यक्षा, सृजना महिला मंडळ, प्रवीण कुमार सिंह, सहाय्यक कमांडंट, सीआयएसएफ यांच्यासह सर्व विभागप्रमुख, कर्मचारी, सृजना महिला मंडळाच्या सदस्या, सीआयएसएफचे जवान, शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद, विद्यार्थी, टाउनशिपमधील रहिवासी तसेच त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

समारंभाचे मुख्य आकर्षण म्हणजे मुलांनी सादर केलेले मनमोहक सांस्कृतिक कार्यक्रम आणि सीआयएसएफ जवानांचे मॉक ड्रिल प्रदर्शन हे होते. यावेळी विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचारी, मुलांना तसेच सीआयएसएफ जवानांना विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

देशभक्तीपर गीतांनी दुमदुमलेला परिसर, तिरंग्याच्या रंगांनी सजलेले वातावरण आणि समारंभातील उत्साह यामुळे स्वातंत्र्यदिनाची भावना अधिकच जिवंत झाली. एनटीपीसी सोलापूर येथे आयोजित हा समारंभ देशप्रेम, एकता, कर्तव्यनिष्ठा आणि उल्लेखनीय कामगिरीचा उत्सव ठरला.

# शिक्षकांच्या हितासाठी कटिबद्ध - आ. ज. मो. अभ्यंकर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** "आपण शिक्षक आमदार या नात्याने शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी आणि त्यांच्या हितासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहोत," असे प्रतिपादन मुंबई शिक्षक मतदार संघाचे आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी केल्याची माहिती डॉ पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनील चव्हाण यांनी दिली.

डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटनेच्या संयुक्त कृती समितीच्या वतीने शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर साहेब यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना ते बोलत होते.

याप्रसंगी कृती समितीच्या वतीने आमदार अभ्यंकर यांच्याकडे शिक्षकांचे विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी साकडे घालण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने जुनी पेन्शन योजना लागू करणे, टीईटी (TET) सक्ती, बीएलओ (BLO) नेमणूक, इ केवायसी साठी मुदत वाढ, तसेच खाजगी प्राथमिक शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणे यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि जिव्हाळ्याच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आमदार अभ्यंकर यांनी या सर्व मागण्या आणि प्रश्न सकारात्मकतेने सोडवण्याचे आश्वासन उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले.

या कार्यक्रमाला राज्य शिक्षक सेनेचे सरचिटणीस रमेश चौगुले,सुनील चव्हाण, आप्पाराव इटेकर, विनोद आगलावे, अब्दुल गफूर अरब, सचिन चौधरी, उल्हास बिराजदार,बरगली लांडगे, जयंत गायकवाड, चंद्रकांत साळुंके, सिद्धाराम अर्जुन, दत्तात्रय पांढरे, जावेद चांदा, मुजम्मिल शेख, शिवराज चौलगी, सुनील राऊत यांच्यासह संघटनांचे अनेक प्रमुख पदाधिकारी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्ही.व्ही.पी. अभियांत्रिकी मध्ये दहा दिवसीय प्लेसमेंट ट्रेनिंग प्रोग्राम संपन्न





**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** विद्या विकास प्रतिष्ठान इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, सोलापूर येथील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलतर्फे अंतिम वर्षातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर सायन्स इंजीनियरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि एमसीए शाखांच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय प्लेसमेंट ट्रेनिंग प्रोग्राम नुकताच संपन्न झाला.

क्वांटा लीप प्रेप यांच्या सहकार्याने आयोजित या प्रशिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कोडिंग, तांत्रिक कौशल्ये, प्रॉब्लेम सॉल्विंग क्षमता तसेच प्लेसमेंटसाठी आवश्यक सर्वांगीण कौशल्ये विकसित करणे हा होता. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना सरावाधारित उपक्रम, संवादात्मक सत्रे आणि उद्योगाभिमुख मार्गदर्शनाद्वारे भरती प्रक्रियेतील विविध टप्प्यांना सामोरे जाण्यासाठी तयार करण्यात आले. अनुभवी प्रशिक्षक प्रभात चौबे, निखिल अवंती आणि अजिंक्य गायकवाड यांनी प्रशिक्षण सत्रे प्रभावीपणे घेतली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक क्षमतांमध्ये वाढ होण्यासोबतच आगामी प्लेसमेंट संधींसाठी त्यांचा आत्मविश्वासही वृद्धिंगत झाला.

शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगाच्या अपेक्षा यांच्यातील दरी कमी करण्यासाठी संस्थेच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलतर्फे सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असून, या दहा दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाची यशस्वी सांगता हा त्याच प्रयत्नांचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

या उपक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. जी. के. देशमुख, अध्यक्ष अमोल (नाना) चव्हाण, उपाध्यक्ष एम. एल. कटकधोंड आणि प्राचार्य प्रा. डॉ. ए. एन. गायकवाड व सर्व विभाग प्रमुख यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे नेतृत्व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट प्रमुख प्रा. प्रसाद कुलकर्णी यांनी केले. तसेच ट्रेनिंग व प्लेसमेंट समन्वयक, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन सुरळीतपणे पार पडले.

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन संपन्न, 1 प्रलंबित प्रकरणावर सुनावणी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 04/03/2013 च्या शासन निर्णयान्वये महिन्यातील तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार आज रोजी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या दालनात पार पडला.

सदर महिला लोकशाही दिनामध्ये मागील एक प्रकरण प्रलंबित होते. त्या प्रकरणावर आज सुनावणी घेण्यात आली.

सदर प्रकरण जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्याशी निगडित आहे. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडून उत्तर प्राप्त न झाल्यामुळे सदरचे प्रकरण प्रलंबित आहे. याबाबत संबंधित विभागाला तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

या जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनास निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, पोलीस अधीक्षक कार्यालयाचे प्रतिनिधी, पोलीस आयुक्तालयाचे प्रतिनिधी, सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अविनाश मगर हे उपस्थित होते.

महिलांच्या तक्रारी, समस्या आणि न्याय मिळवून देण्यासाठी दर महिन्याला महिला लोकशाही दिन घेण्यात येतो.